जिल्हा परिषदेतील वर्ग -३ व वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांनी स्थानिक न्यायालयात व मा.उच्च न्यायालयात उपदान अधिनियम, १९७२ अंतर्गत दाखल केलेले तक्रार अर्ज / अपिल अर्ज.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः संकिर्ण-५०१९/प्र.क्र.६९/आस्था-१०
बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, मुंबई- ४००००१.
तारीख: २७ सप्टेंबर, २०१९.

शासन परिपत्रक :

राज्यातील जिल्हा परिषदेतील वर्ग-३ व वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती, त्यांच्या सेवा शर्ती, त्यांना मिळणारे सेवानिवृत्ती वेतन, उपदान, रजा इत्यादी संदर्भात महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ च्या कलम २४८ नुसार शासनास असलेल्या अधिकारास अनुसरुन वेगवेगळे नियम तयार करण्यात आलेले आहेत. याच तरतूदींनुसार महाराष्ट्र जिल्हा परिषदा व जिल्हा सेवा नियम १९६८ नुसार राज्यातील जिल्हा परिषदेमध्ये कार्यरत असलेल्या वर्ग -३ व वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ लागू करण्यात आलेला आहे. या नियमानुसार निवृत्ती वेतनात उपदान देखील समाविष्ट असून, या नियमानुसार जिल्हा परिषदेच्या संबंधित कर्मचाऱ्यांना सेवानिवृतीनंतरचे लाभ देय ठरतात . जिल्हा परिषदेतील कर्मचाऱ्यांना वेतन व सेवानिवृत्तीविषयक लाभ शासनामार्फत दिले जातात .

२. वरील वस्तुस्थिती असली तरी, शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ च्या कायद्यान्वये शासनास असलेल्या अधिकारानुसार त्यांच्या सेवाशर्तीसंदर्भात तसेच वेतन , निवृत्ती वेतन इत्यादी लाभांबाबत नियम तयार करुन ते त्यांना लागू करण्यात आले असताना, काही कर्मचारी त्यांना केंद्र शासनाच्या उपदान अधिनियम १९७२ नुसार वाढीव उपदान मिळण्यासाठी कामगार न्यायालयात वा उच्च न्यायालयात तक्रार / याचिका दाखल करतात. असे करताना बहुतांश प्रकरणात शासन अत्यावश्यक पक्षकार असतानाही त्यांना या प्रकरणात संबंधित तक्रार कर्त्याकडून पक्षकार केले जात नाही. लोकांच्या करातून मिळणारा निधी जर शासनाच्या आदेशानुसार संबंधित कर्मचाऱ्यांना दिला जात असेल , तर शासनाची बाजू ऐकून त्याबाबत निर्णय घेणे देखील अत्यावश्यक ठरते. मात्र, प्रत्यक्षात संबंधित कर्मचाऱ्यांकडून शासनास पक्षकार करुन घेण्याची कार्यवाही केली जात नाही ही वस्तुस्थिती असली तरी , सबंधित मुख्य कार्यकारी

अधिकारी याबाबत कोणतीही सकारात्मक कार्यवाही करीत नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. अशा प्रकारणात शासनास अत्यावश्यक पक्षकार करुन घेण्यासाठी संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी यांना कामगार / औद्योगिक न्यायालयात आग्रह धरणे वा त्या अनुषंगाने कायदेशिर प्रक्रिया पूर्ण करणे गरजेचे असतानाही त्यांच्याकडून अशी कार्यवाही केली जात नाही . त्यामुळे मा.कामगार / उच्च न्यायालयात शासनाची बाजू ऐकून न घेता निर्णय दिल्याचे आढळून आलेले आहे . ही अत्यंत खेदाची बाब आहे. सबब, या प्रकरणात पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी :-

१) उपदान अधिनियम, १९७२ संदर्भात जी प्रकरणे सद्य :स्थितीत मा.कामगार न्यायालय / औद्योगिक न्यायालय वा उच्च न्यायालय येथे ग्राम विकास विभाग पक्षकार नाही, त्या ठिकाणी ग्राम विकास विभागास पक्षकार करुन घेण्यासाठी न्यायालयाकडे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अग्रह धरावा. आवश्यक तेथे सरकारी वकीलांशी संपर्क साधून कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करावी.

२) मा.औद्योगिक न्यायालय / कामगार न्यायालय वा मा.उच्च न्यायालय यांनी शासनाची बाजू न ऐकता निर्णय दिला असल्यास अशा सर्व प्रकरणांची सविस्तर वस्तुस्थिती पुढील दोन दिवसांत शासनास सादर करावी. जेणेकरुन शासनास पुढील न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण करता येईल.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१९०९१९२२११०३३९२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ravindra Ishwar Giri

Digitally signed by Ravindra Ishwar Giri
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Agriculture and ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fc511494bd6ed3a99adc21454099d86f4055bb93d2941d289397e25bfdbdae6b, cn=Ravindra Ishwar Giri
Date: 2019.09.27 13:01:53 +05'30'

(र. ई. गिरी)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) विभागीय आयुक्त (सर्व)

२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

३) मुख्य सरकारी वकील, मा.मुंबई उच्च न्यायालय, मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ व नागपूर खंडपीठ

४) सर्व जिल्हा सरकारी वकील

५) निवड नस्ती (आस्था-१०)